पुढारी

# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' उपक्रमाची सुरुवात

**कराड : पुढारी वृत्तसेवा**

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड येथे क्विक हिल फाउंडेशन आणि महाराष्ट्र सायबर यांच्या संयुक्त विद्यमाने 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. विद्यार्थी, शैक्षणिक संस्था आणि समाजामध्ये सायबर सुरक्षेबाबत जनजागृती निर्माण करून सुरक्षित डिजिटल वातावरण घडविणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.



**कराड : सायबर वॉरिअर्स विद्यार्थ्यांसमवेत प्राचार्य संजीव वाघ.**

मागील वर्षी महाविद्यालयाने हा उपक्रम अत्यंत यशस्वीरीत्या राबविला होता. उत्कृष्ट कार्याची दखल घेत क्विक हिल फाउंडेशनतर्फे महाविद्यालयाला 'सर्वोत्कृष्ट सायबर स्मार्ट क्लब' हा राष्ट्रीय पुरस्कार, तर क्लब समन्वयकांना 'सर्वोत्कृष्ट शिक्षक समन्वयक' हा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला होता.

यंदाचा उपक्रम 'कमवा आणि शिका' या संकल्पनेवर आधारित असून महाविद्यालयातील २० विद्यार्थ्यांची 'सायबर वॉरियर्स' म्हणून निवड करण्यात आली आहे. हे विद्यार्थी शाळा, महाविद्यालये आणि समाजातील विविध घटकांमध्ये सायबर सुरक्षा, डिजिटल गोपनीयता, डेटा संरक्षण, ऑनलाइन फसवणुकीपासून बचाव, सुरक्षित इंटरनेट वापर आणि जबाबदार डिजिटल नागरिकत्व याविषयी व्यापक जनजागृती करणार आहेत.

कार्यक्रमास प्राचार्य डॉ. संजीव वाघ, उपसंचालक डॉ. एस. के. पाटील, एम. सी. ए विभागप्रमुख प्रा. भागवत पाटील, क्लब समन्वयक प्रा. डॉ. प्रियांका शिंदे, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. आळसुंदकर तसेच शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. उमेश देशपांडे सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत सायबर सुरक्षेबाबत समाजात व्यापक जनजागृती करण्याचे आवाहन केले.

My Satara Edition
Aug 06, 2026 Page No. 03
Powered by: erelego.com